**महिला व बाल विकास विभागाच्या सेवा व योजनांमध्ये शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : समन-२०२५/प्र.क्र.६१/कार्यासन १६**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, नवीन प्रशासकीय भवन,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०२६

**<u>वाचा</u> :-** १) महिला व बाल विकास विभाग, अधिसूचना, क्र. समन २०२४/ प्र.क्र.२९/ का.१६, दि. १३.०५.२०२५,

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि. ३०.०५.२०२५,

३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि. ०३.०८.२०२६,

४) शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीच्या दि. ०६.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महिला व बाल विकास विभागामार्फत समाजातील महिला व बालक या दुर्बल घटकांच्या विकासासाठी सबला, महिलांकरीता समुपदेशन केंद्रे, सखी निवास तसेच बालकांसाठी अंगणवाडी सेवा, बालगृहे, बालसंगोपन योजना, निरीक्षण गृहे, अनाथ बालकांना प्रमाणपत्रे देणे, इत्यादी योजना राबविल्या जातात. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील दि. ३०.०५.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय सेवा (G2C, G2B, G2G) अधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध, नागरिकाभिमुख व पूर्णतः डिजिटल करण्यासाठी शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) राबविण्याबाबत सर्व विभागांना निर्देश देण्यात आले होते. यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. १३.०५.२०२५ च्या अधिसूचनेद्वारे महिला व बाल विकास विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या १० सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. दरम्यानच्या कालावधीत तंत्रज्ञानातील प्रगती, विविध डेटासेट (Poshan Tracker, MahaDBT, DigiLocker इत्यादी) व शासकीय डिजिटल प्रणालींसोबत झालेल्या संगणकीय जोडणीमुळे अर्जदाराची ओळख, बँक खात्याचा तपशील इत्यादी माहिती स्वयंचलितपणे प्राप्त करणे शक्य झाले आहे. यामुळे कागदपत्रांची संख्या कमी करणे, अर्ज मंजुरीचे टप्पे कमी करणे, प्रक्रियेचे सुलभीकरण करणे व नागरिकांना सेवा मिळण्यास होणारा प्रशासकीय विलंब टाळणे शक्य झाले आहे.

नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीच्या दि. ०६.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत समितीने महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सेवा व योजनांचे सुसूत्रीकरण करणे तसेच योजना व सेवांचा GPR करण्याबाबत निर्देश दिले आहेत. **त्यानुषंगाने महिला व बाल विकास विभागाच्या सेवा व योजना अधिक कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायी व नागरिकाभिमुख करण्याकरीता** GPR नुसार सुधारित कार्यपध्दती लागू करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१. <u>सेवांचा GPR:</u> -

महिला व बाल विकास विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या अधिसूचित लोकसेवांचे व योजनांचे सुसूत्रीकरण व कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी GPR प्रणालीअंतर्गत सुधारित कार्यपद्धतीस व प्रक्रियेस शासन मान्यता देण्यात येत आहे. महिला व बाल विकास विभागांतर्गत शासन अधिसूचना दि.१३.०५.२०२५ अन्वये १० सेवा अधिसूचित केलेल्या आहेत. शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीच्या दि. ०६.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार ९ सेवा ह्या लाभार्थी योजनांच्या बाबतीतील असल्याने या सेवा आपले सरकार पोर्टलवरून वगळण्यात येत आहेत.

आता, महिला व बाल विकास विभागांतर्गत **"अनाथ मुलांना प्रमाणपत्र देणे"** ही सेवा सेवा अधिसूचित सेवा म्हणून कायम करण्यात येत असून सदर सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध राहील. अनाथ मुलांना प्रमाणपत्र देणे या सेवेच्या GPR नुसार योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा सुधारीत नमुना **परिशिष्ट अ** मध्ये नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीत Offline पध्दतीत सदर नमुन्यानुसार अर्ज करण्यात यावा. अनाथ मुलांना प्रमाणपत्र देणे या सेवेसाठी ऑनलाईन पोर्टल विकसित केल्यानंतर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावे.

२. <u>योजनांचा GPR:</u> -

अ) <u>Maha DBT पोर्टलवरून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या योजना</u> :-

**१) लेक लाडकी योजना :-**

राज्यात मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दि.३०.१०.२०२३ अन्वये लेक लाडकी ही योजना राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.१ लाख अथवा त्यापेक्षा कमी आहे त्या कुटुंबामध्ये जन्माला येणाऱ्या मुलीकरीता सदर योजना लागू राहील. सदर योजना Maha DBT पोर्टलवर घेण्यात येत आहे. त्यामुळे तळागाळातील लाभार्थ्यांना विनाविलंब व विनासायास योजनेचा लाभ थेट त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. सदर योजनेच्या GPR नुसार योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा सुधारीत नमुना **परिशिष्ट ब** मध्ये नमूद करण्यात आला आहे. लेक लाडकी योजना Maha DBT पोर्टलवर कार्यान्वित झाल्यानंतर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावेत.

**२) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना :-**

राज्यामध्ये अनाथ, निराश्रीत, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलां- मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटुंब उपलब्ध करून देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी मुला- मुलींना रू. २२५०/- व स्वयंसेवी संस्थांना रू.२५०/- इतके सहायक अनुदान देण्यात येते. सदर योजना Maha DBT पोर्टलवर घेण्यात येत आहे. सदर योजनेच्या GPR नुसार योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा सुधारीत नमुना **परिशिष्ट क** मध्ये नमूद करण्यात आला आहे. सद्यस्थितीत Offline पध्दतीत सदर नमुन्यानुसार अर्ज करण्यात यावा. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना Maha DBT पोर्टलवर कार्यान्वित झाल्यानंतर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावेत.

**आ) <u>महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना:-</u>**

नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीने दिनांक ०६.१०.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशास अनुसरून महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

**१) महिला आर्थिक विकास महामंडळ :-**

महिला आर्थिक विकास महामंडळाकडे स्वतंत्र योजना नसून महिला सक्षमीकरणाचे काम विविध प्रकल्पातून राबविण्यात येते. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सद्यस्थितीत सर्व विभागांमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर योजना व महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ज्या क्षेत्रिय समित्यांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाचा समावेश केला जाऊ शकतो त्या समित्यांची सविस्तर यादी व्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नियोजन विभागास उपलब्ध करून द्यावी.

२) महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत उत्पादीत केलेली उत्पादने ॲमेझॉन सहेली, GeMs इ. प्लॅटफार्मवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू करावी. तसेच, उत्पादनास सेंद्रिय प्रमाणपत्र घेण्यासाठी कार्यवाही करावी.

३) इतर विभागाच्या योजना व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार योजनेची फेरतपासणी करण्यात यावी. तसेच, लिंगभाव आणि हवामान या घटकांचा ग्रामकृती आराखड्यात समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावा. GTM अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या माहितीचे MPSIMS/BEAMS या प्रणालीमध्ये संकलन करण्यात यावेत.

**२) अंगणवाडी:-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता व किशोरवयीन मुली यांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंगणवाडी केंद्रांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) अंगणवाडी केंद्र बांधकाम आराखड्यामध्ये सुधारणा करण्याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने अंगणवाडी केंद्रांकरिता जागा उपलब्धता, कार्यपध्दती याबाबतचा विचार करून शिफारशी कराव्यात.

२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत क्षेत्रिय स्तरावरील बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्या कामकाजामध्ये गतीमानता आणण्याकरीता व त्यांचेमार्फत योजनेचे प्रभावी संनियंत्रण होण्याकरिता त्यांचेकरिता KRA व SOP निर्गमित करण्यात यावी.

३) अंगणवाडीमध्ये उपलब्ध करण्यात येणाऱ्या विविध साहित्याचे मॅपिंग होण्याकरिता पोषण ट्रॅकरवर नोंद घेण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

४) पोषण विषयक विविध निर्देशांकासह बालकांचे BMI तपासणी होण्याकरिता सदर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा.

५) अंगणवाडीमध्ये वीज सुविधा उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

६) सक्षम अंगणवाडी योजनेअंतर्गत ज्या अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन केले आहे अशा सर्व अंगणवाड्यांना उपलब्ध केलेल्या सोयी सुविधाची नोंद पोषण ट्रॅकरमध्ये घेण्यात यावी.

**३) बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना:-**

**१) अनाथांकरिता शैक्षणिक व परिक्षा शुल्क माफी:-**

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या अनाथ लाभार्थ्यांचे शैक्षणिक व परिक्षा शुल्क शासनाकडून अदा करण्यात येते. या योजनेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

शिक्षण व परिक्षा शुल्क माफीच्या योजना आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य, उद्योजकता व नाविण्यपुर्णता विकास विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याकडून ज्याप्रमाणे राबविण्यात येतात त्याचप्रमाणे अनाथांकरिता फी माफीकरिता निधी संबंधित विभागांना उपलब्ध करून देऊन त्यांच्यामार्फत शैक्षणिक व परिक्षा माफीच्या अनुषंगाने निधी वितरणाची कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने महिला व बाल विकास विभागाने संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करावा.

**२) कोविड -१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांकरीता अर्थसहाय्य योजना:-**

या योजनेअंतर्गत कोविड-१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांकरीता एकरकमी रूपये ५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य संबंधित बालक व जिल्हा महिला बालविकास अधिकारी यांच्या संयुक्त बँक खात्यात जमा करण्यात येते. सदर योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा डेटा MAHA-ID साठी महासारथी यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

**३) चाचा नेहरू बाल महोत्सव योजना:-**

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांकरिता काम करणाऱ्या संस्थांमधील प्रवेशितांच्या खिलाडू वृत्ती व कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा व राज्यपातळीवर क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धामध्ये विविध पातळीवर भाग घेणाऱ्या स्पर्धकांना क्रिडा विभागामार्फत अधिकृत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात क्रिडा विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करावी.

**४) महिलांकरीता राबविण्यात येणाऱ्या योजना:-**

**१) केंद्रपुरस्कृत मिशन शक्ती योजना :-**

या योजनेअंतर्गत राज्यातील निराधार, निराश्रीत, नैसर्गिक आपत्तीत/ कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला, अनैतिक व्यापारातून सुटका झालेल्या महिला व मुली यांचे स्वंयसेवी संस्थाच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व प्रशिक्षण देऊन पुनर्वसन केले जाते. सदर योजनेसंदर्भात Distress Tab विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावा. तसेच यासंदर्भात राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या क्षेत्रातील शक्ती सदन केंद्र, महिला राज्यगृह, वनस्टॉप सेंटर, महिला संरक्षण गृह यांची यादी संपर्क क्रमांकासह अद्ययावत करून उपलब्ध करून देण्यात यावी.

**२) सखी निवास :-**

सदर योजना ही नोकरी करणाऱ्या, एकट्या, अविवाहित, विधवा, घटस्पोटीत, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या स्त्रीयांच्या संरक्षणाच्या दृष्टीने राहण्याची सोय करण्यासाठी राबविली जाते. याअनुषंगाने राज्यशासनाचे तयार करण्यात येत असलेले Common Hostel Portal यामार्फत महिलांना वसतीगृहात online प्रवेश देण्याकरिता कार्यवाही करण्यात यावी. Common Hostel Portal तयार होईपर्यंत त्यांचे अर्ज Offline पध्दतीने **परिशिष्ट -ड** मधील नमुन्यानुसार घेण्यात यावेत.

**३) महिला हेल्पलाईन क्रमांक १८१: -**

महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना संकट समयी तातडीने मदत मिळण्यासाठी महिला हेल्पलाईन १८१ ही कार्यरत आहे. याद्वारे महिलांकडून त्यांच्या विविध तक्रारी, शंका अथवा संकटकाळी मदत (Distress calls) यासंदर्भात विचारणा केली जाते. तथापि, Distress call करणाऱ्या महिलांना तातडीने मदत मिळण्यासाठी स्वतंत्र Dedicated lines करण्यात याव्यात.

**४) शुभ मंगल समुदाय विवाह योजना :-**

सदर योजना ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे सादर करण्यात यावा.

३. **संकेतस्थळ पुनर्रचना:-**

महिला व बाल विकास विभागाच्या संकेतस्थळाची रचना व त्यातील तपशीलामध्ये सुधारणा लवकर करण्यात यावी. संकेतस्थळामध्ये विभागाच्या विविध सेवा व योजना संदर्भातील टॅब चा समावेश असावा.

४. **विभागाच्या योजनांच्या संदर्भात GPR संबंधी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने खालील योजना बंद करण्यात येत आहेत:-**

| अ.क्र. | योजनेचे नाव | लेखाशिर्ष | योजनेसंदर्भातील निर्देश |
|---|---|---|---|
| १. | महिलांसाठी बहुउद्देशिय समाज केंद्राची स्थापना | २२३५२९४९ | महिलांचा विकास व उन्नतीकरीता महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणासंदर्भात मार्गदर्शन व कायदा विषयक सल्ला देणे, आपदग्रस्त महिलांना आधार देण्याबाबत मदत करणे, वाचनालयासारख्या सुविधा पुरविणे इ. सेवा बहुउदेशिय महिला केंद्रामार्फत पुरविण्यात येतात. सदरहु केंद्रे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येतात. त्यासाठी संस्थाना वार्षिक अनुदान मंजूर करण्यात येते. तथापि, या योजनेवरील कमी खर्च लक्षात घेता सदर योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून निरसित करण्यात येत आहे. |
| २. | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये महिला मंडळांना अनुदाने देण्यासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान. | २२३५२१३४ | ग्रामीण व शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांना मदत करण्याकरीता त्या स्त्रियांना व्यावसायिक शिक्षणाच्या आधारे अर्थार्जनाचे साधन उपलब्ध करुन देऊन त्या स्वत:चा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकतील या उद्देशाने महिला मंडळे अथवा महिला स्वयंसेवी संस्थेस महिला प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याच्या अनुषंगाने अनुदान देण्यात येते. या योजनेसाठी निधीची मागणी नसल्यामुळे तसेच, प्रतिसाद कमी असल्यामुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सदर योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून निरसित करण्यात येत आहे. |
| ३. | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७अन्वये महिला देवदासींच्या पुनर्वसनाच्या योजनांसाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान. | २२३५१८५३ | देवदासींच्या मुला मुलींना योग्य शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील कोल्हापूर व सांगली या दोन जिल्हयांत देवदासींच्या मुला मुलींकरीता वसतिगृह ही योजना राबविण्यात येत असून सदरील योजने अंतर्गत दोन स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. संस्थेस लाभार्थीच्या परीरक्षणासाठी दरमहा दरडोई रु.९५०/- देण्यात येतात. या योजनेसाठी निधीची मागणी नसल्यामुळे सदर योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून निरसित करण्यात येत आहे. |
| ४. | अंगणवाडी केंद्रांना सौर ऊर्जा संच पुरविणे. | २२३६२६५६ | राज्यातील स्वमालकीच्या ज्या अंगणवाडी केंद्रांना वीज सुविधा उपलब्ध नाही अशा केंद्रांना १ कि. वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा संच उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दरम्यान, केंद्र शासनाने ज्या अंगणवाडी केंद्रांना वीज सुविधा उपलब्ध आहे अशा अंगणवाडी केंद्रांना वीज शुल्काकरिता दरमहा रुपये ५००/- इतकी रक्कम अनुज्ञेय केलेली आहे. सबब, सदर योजना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून निरसित करण्यात येत आहे. |
| ५. | माझी कन्या भाग्यश्री(सुधारीत) | २२३५B९३३ | माझी कन्या भाग्यश्री ही सुधारित योजना शासन निर्णय दिनांक १.८.२०१७ अन्वये लागू करण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत मुदत ठेवीच्या स्वरूपात लाभ देण्यात येत होता. सद्यस्थितीत योजना बंद झालेली आहे. प्रस्तुत योजना अधिक्रमित करून दि. ०१.०४.२०२३ पासून लेक लाडकी योजना सुरू करण्यात आली आहे. त्यानुषंगाने माझी कन्या भाग्यश्री |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | योजनेतील दि. ३१.०३.२०२३ पर्यंतच्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता सदर लेखाशीर्षामधून निधी वितरीत करण्यात येत होता. सदर योजनेमध्ये लाभार्थ्यांना लाभ अदा करणे प्रलंबित असल्यास माहे मार्च २०२७ अखेर लाभ अदा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी व सन २०२७-२८ पासून लेखाशिर्ष निरसित करण्यात यावे. |
| ६. | आधारगृह चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाना सहाय्य. | २२३५१२८१ | सदर योजना १६ ते ६० वर्षे वयापर्यंतच्या निराधार, निराश्रित, परित्यक्ता, कुमारीमाता संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना आश्रय, संरक्षण व मुलभुत सुविधा पुरवून त्यांचे नोकरी/व्यवसाय, विवाह याव्दारे पुनर्वसन करण्याकरीता स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येते. केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्व जिल्ह्यात शक्ती सदन स्थापन करणेसंदर्भात केंद्र शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. सर्व जिल्हयात शक्ती सदन स्थापन झाल्यानंतर सदर योजना आर्थिक वर्ष २०२७-२८ पासून निरसित करण्यात येत आहे. |
| ७. | कोविड-१९ कालावधीत अनाथ झालेल्या बालकांसाठी अर्थसहाय्य. | २२३५C५०१ | कोवीड-१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांचे शिक्षण व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होईपर्यंतचे आयुष्य त्यांना सन्मानाने जगता यावे व याकामी आर्थिकदृष्ट्या मदत पूरक ठरावी या हेतूने अनाथ बालकांना एकरकमी रू.५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य करणेकरीता सदर योजना चालू करण्यात आली होती. त्यानुसार विभागामार्फत या योजनेअंतर्गत पात्र बालकांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात आले. आता कोवीड-१९ चा प्रादूर्भाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जवळजवळ संपुष्टात आला असून सन २०२५-२६ या वर्षात तसेच, सन २०२६-२७ मध्ये अद्यापर्यंत शासनास एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही. सदर योजना आर्थिक वर्ष २०२७-२८ मध्ये निरसित करण्यात येत आहे. |

५. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई, आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, वांद्रे, मुंबई यांनी या शासन निर्णयाला अनुसरून प्रभावी अंमलबजावणीसाठी तात्काळ क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना व कार्यालयीन आदेश निर्गमित करावेत.

६. सदरचा शासन निर्णय हा योजनांच्या सुसूत्रीकरणाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या योजना व सेवा यांच्याबाबतीतील इतर तरतूदी ह्या त्या त्या योजना व सेवांच्या मूळ शासन निर्णयाप्रमाणे रहातील.

७. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठित शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीने दि.०६.१०.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१६१२०४४०२५३० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANUP KUMAR YADAV

Digitally signed by ANUP KUMAR YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=5f3908d24b2568f3b31ae7a2607b77e47b9cced8530762f703728fbf48d2b4f9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=04D0A29A400CB59ACDA95D417719F74B7810596B06FB1A4D38C8EA417B170BB0, cn=ANUP KUMAR YADAV
Date: 2026.10.16 12:05:49 +05'30'

**(डॉ. अनुपकुमार यादव)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-** १ . मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद / मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,

६. मा. विरोधी पक्षनेते, विधान सभा / विधानपरिषद, मुंबई,

७. मा. मंत्री (महिला व बाल विकास विभाग), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

८. मा. राज्यमंत्री (महिला व बाल विकास विभाग), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

९. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई,

१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,

११. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (वित्त / नियोजन / सामान्य प्रशासन / मा.तं), मंत्रालय, मुंबई,

१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१३.मा. सचिव (महिला व बाल विकास) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

१४. सर्व सह/ उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१५.आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१६.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई,

१७.सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई,

१८.उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,

१९.उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,

२०.सर्व विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) ,

२१.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

२२.सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद,

२३.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,

२४.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

२५. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

२६. निवडनस्ती (कार्यासन-१६).

# परिशिष्ट-अ

## अनाथ आरक्षण प्रमाणपत्र अर्ज

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | अर्ज दिनांक | |
| २ | आधार क्रमांक | |
| ३ | अर्जदाराचे पूर्ण नाव (In English) | |
| ४ | लिंग | |
| ५ | अर्जदाराचा जन्म दिनांक | |
| ६ | अर्जदाराचे वय | |
| ७ | इ मेल (Email id) | |
| ८ | फोन नंबर (Mobile number) | |
| ९ | राज्य | |
| १० | जिल्हा | |
| ११ | तालुका | |
| १२ | गाव | |
| १३ | पूर्ण पत्ता | |
| १४ | आईचे नाव | |
| १५ | आईचा मृत्यू दिनांक | |
| १६ | आईच्या मृत्यूच्या दिवशी अर्जदाराचे वय | |
| १७ | वडिलांचे नाव | |
| १८ | वडिलांचे मृत्यू दिनांक | |
| १९ | वडिलांच्या मृत्यूच्या दिवशी अर्जदाराचे वय | |
| २० | अनाथ वर्ग | |
| २१ | मागील/अलीकडील संस्थेत वास्तव्याची सुरुवातीची तारीख | |
| २२ | मागील/अलीकडील संस्थेत वास्तव्याची शेवटची तारीख | |
| २३ | एकूण दिवस वास्तव्य | |
| २४ | संस्थेचे नाव | |

Document required at the time of application.

- Child Aadhar Card
- Birth certificate or school leaving certificate
- Mother's death certificate
- Father's death certificate
- Institute leaving certificate (NGO / Govt) (Only for institutional children)
- Domicile certificate

# परिशिष्ट ब
# लेक लाडकी योजना


Government of Maharashtra | Skip to main content | A+ A A- | English

महाDBT | Maha ONE

Apply for Scheme | My Applications | Grievance | Fishery | My Application 2 | Labour | Sports

## Apply for Scheme

**Lek Ladki Yojana**
Women and Child Development Department

← Back to Dashboard | View Scheme Details

### Personal Information

#### Applicant Details

Child for whom the application is being made * — Select

Number of alive children in the family (excluding the girl child for whom the application is being submitted) * — Select

Is Mother Alive? * — Select

Is Father Alive? * — Select

#### Current Address

Residential area * — Select

Address * — Address

District * — Select

Pincode * — Pincode

#### Other Details

Ration Card Number * — Enter ration card number

Beneficiary's ration card * — Choose File | No file chosen
Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Domicile Certificate Number * — Enter domicile certificate number | Fetch

Proof of Domicile (Domicile Certificate) * — Choose File | No file chosen
Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Income Certificate Number * — Enter income certificate number | Fetch

Income Certificate (less than Rs 1 lakh) * — Choose File | No file chosen
Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

### Additional Declaration

- I, Shri./Smt. ____________ (Father/Mother/Guardian), declare that the information furnished in this application is true and correct to the best of my knowledge. In case any information is found false or misleading, action may be taken against me as per applicable rules.

☐ I have read and agree to this declaration.

Cancel | Save As Draft | Preview/Print/Download | Submit Application

# परिशिष्ट- क
## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना


Government of Maharashtra
Skip to main content
महाDBT Maha ONE
Apply for Scheme | My Applications | Grievance | Fishery | My Application 2 | Labour | Sports

Apply for Scheme

Krantijyoti Savitribai Phule Balsangopan Scheme
Women and Child Development Department
← Back to Dashboard | View Scheme Details

Search by MAHA ID
Enter your MAHA ID | Search

Application Form

Personal Details
Aadhaar Number * — Aadhaar Number — Verify
Name of the Child * — Name of the Child
Gender * — Select
Date of Birth * — DD/MM/YYYY
Age * — Age
Parents/Guardian Name * — Parents/Guardian Name
Mobile Number * — Mobile Number — Verify
Family Annual Income * — Family Annual Income

Current Address Details
District * — Select
Taluka * — Select
Village * — Select
Address * — Address

Permanent Address Details
Is Permanent Address same as Current Address? * — Select
District * — Select
Taluka * — Select
Village * — Select
Address * — Enter address

Document and Other Details
Upload any one of these documents: Birth Certificate or School Leaving Certificate.
Upload Child Photo * — Choose File — No file chosen — Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)
Domicile Certificate Number * — Enter domicile certificate number — Fetch
Domicile Certificate * — Choose File — No file chosen — Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)
Are parents alive? * — Select
Aadhaar Number (Guardian/Parents) * — Enter aadhaar number (guardian/parents) — Verify
Birth Certificate — Choose File — No file chosen — Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)
School Leaving Certificate — Choose File — No file chosen — Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)
Child Category * — Select
Income Certificate Number * — Enter income certificate number — Fetch
Income Certificate * — Choose File — No file chosen — Accepted formats: PDF, JPG, JPEG (Max 5MB)

Additional Declaration
- I, ______________, residing at ______________, being the mother / father / relative / caregiver of the child ______________, hereby submit this undertaking stating that I am willing to take care and maintain the said child.
- I, ______________, residing at ______________, being the mother / father / relative / caregiver of the child ______________, hereby submit this undertaking stating that the said child is not availing benefits under any other scheme.

☐ I have read and agree to this declaration.

Cancel | Save As Draft | Preview/Print/Download | Submit Application

## परिशिष्ट ड

### सखी निवास अर्ज

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | अर्ज दिनांक | |
| २ | आधार क्रमांक | |
| ३ | पूर्ण नाव | |
| ४ | जन्म तारीख | |
| ५ | कायमचा पत्ता | |
| ६ | भ्रमणध्वनी(Mobile No.) | |
| ७ | आपत्कालीन संपर्क क्रमांक | |
| ८ | कार्यालय / कंपनीचे नाव व पत्ता | |
| ९ | कार्यालय / कंपनीचा भ्रमणध्वनी (Mobile No.) | |
| १० | पदनाम (Designation) | |
| ११ | मासिक वेतन (Salary) | |

Documents required at the time of application.

- Aadhar Card
- Address Proof
- Company Appointment Letter
- Salary Slip
- Medical Fitness Certificate